8/2016

2015-16

Peer Reviewed Annual

ISSN 2454-7409
Vol. I Issue I Jan. 2016

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका



अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या ... येथील पहिल्या अधिवेशनाची दुर्मिळ छायाचित्रे



... डोके, उद्घाटक कुलगुरू डॉ. के.जी. देशमुख, संस्थापक अध्यक्ष डॉ. भाऊ मांडवकर व इ...

मराठी भाषा, संस्कृती व अस्मिता जोपासणारे
मराठी विषयाचे प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासक यांच्या
संशोधनकार्याला चालना देणारे वार्षिक



**डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र**
**आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद**
**यांचा संयुक्त उपक्रम**

196 195

330

Scanned with CamScanner

ISSN 2454-7409

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

Peer Reviewed Annual National Research Journal

वर्ष पहिले, अंक पहिला, जानेवारी २०१६

**मुख्य संपादक**
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब

**प्रकाशक**
प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

**मुद्रक**
सेवा प्रकाशन
विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६

**मुखपृष्ठ**
डॉ. पवन मांडवकर

**Communication**
Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401
e mail – marathipradhyapak@gmail.com
Alternate mail id – imvkalamb@yahoo.co.in
Tele. 07201-226170, 226147, 226129 Mob. 9422867658, 9403014885
Website: www.indiramahavidyalaya.com

जानेवारी, २०१६

196
330

# अनुक्रमणिका



| | | | |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | डॉ. पवन मांडवकर | ३ |
| २ | प्राचीन भारतीय स्त्री–जीवन : ठळक वैशिष्ट्ये | प्रा.डॉ. अपर्णा पाटील | ५ |
| ३ | स्त्रीवादाचा मराठी साहित्यावर प्रभाव | डॉ. स्वाती दामोदरे | ९ |
| ४ | 'साधना' साप्ताहिकाचे प्रबोधन कार्य | प्रा.डॉ. प्रमोद देवके | १४ |
| ५ | मिरासदारांच्या ग्रामीण विनोदी कथा : एक आकलन | डॉ. आर.एम. केदार | १७ |
| ६ | मराठवाड्यातील लेखिकांच्या साहित्यातील 'स्त्री विषयक जाणिवा | अमोल शिवाजीराव खोसे | २० |
| ७ | वारकरी संप्रदायाचा भक्तियोग | प्रा.डॉ. राम पैनेकर | २२ |
| ८ | मराठीच्या अभ्यासक्रमाचे आदर्श स्वरूप | डॉ. प्रशांत शेळके | २५ |
| ९ | मराठीतील स्त्रियांच्या कथालेखनाचे स्वरूप | प्रा.डॉ. लीना शेंडे | २८ |
| १० | राजन गवस यांची 'तणकट' कादंबरी आणि राजकारण | प्रा. दिपक मायस्कर | ३१ |
| ११ | महात्मा फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्मातील धार्मिक सहिष्णुता | प्रा.डॉ. संतोष विष्णू पतुर | ३४ |
| १२ | बौद्ध संस्कृती | प्रा. रवींद्र खंडेराय | ३८ |
| १३ | नक्षलवाद आणि आदिवासी साहित्यिकांची भूमिका | प्रा.मृदुला राउत्रे–आंबेडकर | ४२ |
| १४ | आंबेडकरी कविता अभिव्यक्ती आणि स्वरूप | प्रा. डॉ. रमेश खंडारे | ४४ |
| १५ | स्वातंत्र्योत्तर कालखंड वैदर्भीय कादंबरीतील रंजनवाद | डॉ. पवन मांडवकर | ४८ |
| १६ | ग्रामीण साहित्याचे मराठी वाङ्मयातील योगदान : एक साधक बाधक चर्चा | प्रा.डॉ. युवराज मानकर | ५२ |
| १७ | भारतीय संस्कृती आणि योगिनींचे महत्त्व | डॉ. माधुरी भटकर | ५७ |
| १८ | भारतीय स्त्रीवादाचा देदीप्यमान तारा : ताराबाई शिंदे | प्रा. डॉ. विशाखा कांबळे | ५९ |
| १९ | ग्रामीण साहित्यातील निसर्ग जाणिवा | डॉ. कल्पना त्र्यं. मेहरे | ६३ |
| २० | तुकारामांचा ईश्वर व अंधश्रद्धाविषयक विचार | डॉ. नवनाथ दगाने | ६५ |
| २१ | स्त्री–मुक्ती चळवळीतील गेलाचा दगड मुलगी झाली हो.... (पथनाट्य) | प्रा.डॉ. भूमिका वानखडे | ६९ |
| २२ | वैदर्भीय ग्रामीण स्त्री कथाकारांच्या कथेतील स्त्रीचित्रण | प्रा. नेमीचंद एफ. चव्हाण | ७२ |
| २३ | स्वातंत्र्योत्तर काव्यातील ग्रामीण साहित्याचे बदलते स्वरूप | प्रा.लिंगायत विशाल प्रकाश | ७७ |
| २४ | ग्रामीण साहित्याचे चार विशेष | प्रा. अतुलकुमार सारडे | ८१ |
| २५ | ग्रामीण साहित्याचे मराठी वाङ्मयात योगदान | डॉ. रमाकांत ईटेवाड | ८४ |
| २६ | १९८० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरूप | प्रा. डॉ. सविता पवार | ८७ |
| २७ | ग्रामीण साहित्यातील अनुभवविश्व | डॉ. सुवर्णा रा. गाडगे | ९१ |
| २८ | समाज परिवर्तन आणि ग्रामीण साहित्य | प्रा. र.तु. आदे | ९५ |
| २९ | मराठीतील नवा साहित्य प्रवाह: आदिवासी साहित्य | अनिता अर्जुन कांबळे | ९९ |
| ३० | वैदर्भीय मराठी गझलेतील सामाजिक जाणीव | प्रा. संजय एस. पोहरे | १०२ |
| ३१ | लोकसाहित्य : व्याख्या, महत्त्व आणि प्रयोजन | प्रा.डॉ. वीरा मांडवकर | १०६ |
| ३२ | ग्रामीण साहित्य आणि शेतकऱ्यांचे जीवनवास्तव | प्रा. डॉ. गजानन हेरोळे | ११० |
| ३३ | वऱ्हाडी कादंबरीतील ग्रामीणवास्तव आणि शेती जीवन | डॉ. राजेश मिरगे | ११३ |
| ३४ | मराठी ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा आणि ग्रामीण कादंबरी | डॉ. माधव जाधव | ११६ |
| ३५ | संत एकनाथांची समयसूचकता | प्रा. डॉ. विठ्ठल जंबाले | १२२ |
| ३६ | ग्रामीण कादंबरीतील निसर्गदर्शन | डॉ. पंढरी डोईफोडे | १२५ |
| ३७ | रा.रं. बोराडे यांच्या कथेतील बदलते स्त्रीजीवन | प्रा. वाघमारे बी.एस. | १२८ |





198 197

330

# १९८० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरूप

प्रा. डॉ. सविता माधवराव पवार
कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, जि. बुलढाणा
भ्रमणध्वनी ९०११५७९०७७

## प्रस्तावना

ग्रामीण भागातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा, रीती या सर्वांतून निर्माण झालेल्या समस्यांचे चित्रण जे साहित्य करते त्याला ग्रामीण साहित्य म्हणता येईल. ग्रामीण साहित्यामध्ये कथा, कादंबरी, कवितेच्या माध्यमाद्वारे ग्रामीण जीवनाचे चित्रण झाले आहे. १९८० नंतरच्या काळात ग्रामीण साहित्यामध्ये बदल होत गेला. साहित्यात बदल हे होत असतात कारण साहित्याचा जीवनाशी अन्योन्यसंबंध असतो. १९५७ च्या सुमारास ग्रामीण साहित्याची नव्याने मांडणी होऊ लागली. या काळात लिहिणारे लेखक ग्रामीण जीवनाशी निगडित, संबंधित होते. आधुनिक ग्रामीण साहित्याचा जेव्हा आपण विचार करायला लागतो, त्याचा आरंभकाळ १९२५ च्या दरम्यानचा पाहिला आहे. या काळी लेखन करणारे लेखक हे पांढरपेशा वर्गातले होते. साहित्य हे मानुष्याने रंजनासाठी निर्माण करायचे असते, असे समजण्याचा तो काळ होता. जे मी पाहिले आहे, भोगले आहे, अनुभवले आहे, त्यातूनच आलये जे साहित्य निर्माण होत आहे, तसे स्वरूप प्रारंभकाळी नव्हते. आज ग्रामीण साहित्याचा विचार करता ते वास्तवाला अधिक जवळचे आहे असे म्हणता येईल.

देश स्वतंत्र झाला. गावगाडा मोडला गेला. साहित्याचा नायकही बदलत गेला. तो कष्टकरी झाला. नवी पिढी नव्या दृष्टीने जीवनाकडे पाहू लागली. खेडी शहराला दळणवळणाच्या माध्यमातून जोडली गेली. खेड्यातला एक घटक कसा उद्ध्वस्त होतोय त्याचे चित्रण ग्रामीण साहित्यातून यायला लागले. मराठी साहित्याच्या प्रवाहामध्ये ग्रामीण साहित्य हा प्रवाह स्वतःच्या अस्मितेची जाणीव ठेवून पुढे जाणारा प्रवाह आहे. ग्रामीण साहित्याच्या प्रवाहामध्ये ग्रामीण कादंबरीने मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण कादंबरीच्या बाबतीत १९४५ नंतरचा कालखंड महत्त्वाचा आहे. या कालखंडात एकूणच मराठी साहित्यामध्ये परिवर्तन घडून आले. या काळातील अनेक लेखक वस्तुनिष्ठ चित्रणाकडे लक्ष द्यायला लागले. तांबडी माती, बळी, भावीण, हद्दपार, गारंबीचा बापू, पवनाकाठचा धोंडी, शितू, पडघवली, बनगरवाडी, फकीरा इ. ग्रामीण कादंबऱ्यांतून बदललेल्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते. १९६० नंतरच्या काळात यंत्रयुगाने ग्रामीण संस्कृतीवर प्रभाव टाकला. ग्रामव्यवस्था विस्कळीत झाली. टारफुला, पाचोळा, गांधारी, गोतावळा आदी कादंबऱ्या या कालखंडात लिहिल्या गेल्या. १९८० नंतरच्या काळात ग्रामजीवनात प्रचंड उलथापालथ झाली. विज्ञान व तंत्रज्ञानाने केलेली प्रगती, जंगलवाद, पाणी टंचाईचा गंभीर प्रश्न, सततच्या नापिकीमुळे हैराण झालेला शेतकरी वर्ग यामुळे ग्रामजीवन विस्कळीत झाले. या कालखंडातील ग्रामजीवनाचे वास्तववादी चित्रण अनेक कादंबरीकारांनी केले आहे. सदानंद देशमुख, शंकर सखाराम, विश्वास पाटील, द.र. बोराडे, बाबाराव मुसळे, अशोक कोळी इ. कादंबरीकारांचा उल्लेख करता येईल. तहान, बारोमास, एस.ई.झेड., पाचोळा, झाडाझडती, पखाल, वारूळ या कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनाचे वास्तववादी चित्रण आले आहे.

## १९८० नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी

१९८० नंतरच्या कालखंडात डॉ. आनंद यादव यांनी 'झोंबी,' 'नांगरणी,' 'घरभिंती' इ. आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या लिहिल्या. र. र. बोराडे यांच्या 'सावट,' 'चारापाणी,' आणि 'आमदार सौभाग्यवती,' इ. कादंबऱ्या याच काळात आल्या. नागनाथ कोत्तापल्ले यांची 'गांधारीचे डोळे', बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुधू दे', वासुदेव मुलाटे यांची 'विषवृक्षाच्या मुळ्या' या सर्व कादंबऱ्यांतून ग्रामीण भागातील विदारक स्थिती, राजकारण, तरुण मनाचा उद्रेक, ग्रामीण भागातील प्रश्न, ग्रामीण माणसाचे अपेक्षाभंगाचे दुःख चित्रित झालेले दिसते. या काळातील या साहित्यनिर्मितीला ग्रामीण साहित्य चळवळीचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष असा स्पर्श झालेला आहे, ही वस्तुस्थिती लक्षात घ्यावी लागते. पुरुषोत्तम बोरकर, राजन गवस, विश्वास पाटील यांनीही ग्रामीण कादंबरी संपन्न करण्याचे काम केले आहे.'चौंडक','भंडारभोग', 'तणकट' या राजन गवस यांच्या कादंबऱ्या तसेच 'मेड इन इंडिया' ही पुरुषोत्तम बोरकर यांची ग्रामीण भागातील राजकारणाची उपहासात्मक चित्रण करणारी कादंबरी तसेच



330
Co - Ordinator ...
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana
139 198

धरणग्रस्तांच्या प्रश्नावरील विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' ही कादंबरी इ. या काळातील साहित्यकृतींचाही उल्लेख करता येईल.

शेतकऱ्यांची होणारी ससेहोलपट बाबाराव मुसळे यांनी 'हाल्या हाल्या दुधु दे' (१९८५) या कादंबरीतून मांडली आहे. 'पखाल' (१९९५) या त्यांच्या कादंबरीमध्ये ग्रामीण जीवनातील दुःख, दैन्य, शोषण यांचे चित्रण आले आहे. पाणीप्रश्न हा या कादंबरीच्या केंद्रस्थानी दिसतो. ही कादंबरी पुंजा व त्याच्या कुटुंबाची शोकांतिका आहे. नळयोजनेमुळे गावात नळ येतात, त्यामुळे पखालीने पाणी वाहणाऱ्या पुंजाचे जीवन उद्ध्वस्त होते याचे चित्रण लेखकाने या कादंबरीत करून ग्रामीण भागात परंपरागत व्यवसाय कसे धोक्यात आले आहेत त्याचे वास्तवदर्शी चित्र या कादंबरीद्वारे उभे केले आहे. त्यांचीच 'वारूळ' (२००४) ही कादंबरी ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविते. ही दीर्घ कादंबरी असल्यामुळे तिच्यामध्ये विविध घटना येतात. वैदर्भीय ग्रामीण जीवन, ग्रामीण माणूस, शेती, रूढीपरंपरा यांचे वस्तुस्थितीपूर्ण चित्रण बाबाराव मुसळे यांच्या कादंबऱ्यांतून आले आहे. ग्रामीण जीवनानुभवाचे प्रत्ययकारी चित्रण बाबाराव मुसळे आपल्या कादंबऱ्यांतून उभे करतात.

.रवींद्र शोभणे यांची 'कोंडी' (१९९२) सदानंद देशमुख यांनी 'तहान' (१९९८) आणि 'बारोमास' (२००२) या कादंबऱ्यांनीही मराठीमध्ये मोठे स्थान प्राप्त केले आहे. परिसर वैशिष्ट्यांसह व्यक्त होऊन त्यांनी मराठी ग्रामीण व प्रादेशिक कादंबरीवर आपली छाप पाडली आहे. ग्रामीण व प्रादेशिक कादंबरीने मराठी कादंबरीत देशी जाणीव रुजविली, हे तिचे मोठे श्रेय आहे. सदानंद देशमुख यांनी ग्रामीण समाजवास्तव प्रकर्षाने मांडले आहे. कथानकाची पकड व औपचारिक मांडणी त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून केलेली दिसते. पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न त्यांनी 'तहान' या कादंबरीतून मांडला आहे. 'मेड इन इंडिया' (१९८९) ही पुरुषोत्तम बोरकर यांची एक वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी आहे. या कादंबरीचा नायक हा शहरी वातावरणात राहून आलेला आहे . गावात झालेला बदल, गावातील राजकारण, अर्थकारण, सोयीसुविधा तो अलिप्तपणे पण चिकित्सकरीत्या पाहतो. गंभीर विषय अत्यंत कौशल्याने लेखकाने या कादंबरीमध्ये हाताळला आहे. पाण्याची समस्या ही ग्रामीण भागातील मोठी समस्या. या समस्येचे चित्रण 'पांगिरा' आणि 'तहान' यांसारख्या कादंबऱ्यांतून आले आहे. समृद्ध गाव पाण्याच्या गैरवापरामुळे कसा उद्ध्वस्त होत जातो, त्याचे चित्रण विश्वास पाटील यांची 'पांगिरा' (१९९०) ही कादंबरी करते. रवींद्र शोभणे यांची 'कोंडी' (१९९२) ही कादंबरी नरखेड तालुक्यातील खरसोली या गावाचे कथानक मांडते. गणपत व कौसी यांच्या उद्ध्वस्त जीवनाची करुण कहाणी या कादंबरीतून उभी केली आहे. समकालीन वास्तव आपल्या लेखनाद्वारे यशस्वीपणे मांडण्याचा प्रयत्न रवींद्र शोभणे यांनी आपल्या कादंबऱ्यांतून केला आहे. त्यांच्या 'पांढर' (२०१०) या कादंबरीत दुष्काळाच्या निमित्ताने सामाजिक पर्यावरणाचा वेध चिकित्सकपणे घेतला आहे. दुष्काळाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांमध्ये उलट पालिला ब्याहो, मनगरवाडी, फकिरा, तहान इ. कादंबऱ्यांप्रमाणेच 'पांढर' या कादंबरीचे योगदानही महत्त्वाचे आहे. वैदर्भीय ग्रामीण स्त्री कादंबरीकार म्हणून प्रतिमा इंगोले यांचाही उल्लेख महत्त्वपूर्ण आहे. बदलत्या काळात ग्रामीण जीवनामध्ये स्त्रीच्या दर्जामध्ये बदल झाला नाही, त्याचे चित्रण त्या करतात. त्यांच्या 'बुढाई' (१९९२) या कादंबरीचा उल्लेख महत्त्वाचा आहे.
१९८० नंतरच्या काळात ग्रामीण जीवनाचा विचार अनेक अंगांनी ग्रामीण कादंबरीतून कादंबरीकारांनी मांडलेला दिसतो. २००१ मध्ये 'ऐसे कुणबी भूपाळ' ही भारत काळे यांची कादंबरी प्रकाशित झाली. ग्रामीण बोलीचा समर्थपणे वापर या कादंबरीमध्ये करण्यात आला आहे. एका कुटुंबातील सत्तासंघर्ष या कादंबरीतून वर्णिला आहे. सरकारी पातळीवर सुरू असणाऱ्या विविध योजना वरपासून खालपर्यंत कोणत्या पद्धतीने राबविल्या जातात, त्याचे भेदक चित्रण रमेश इंगळे उत्रादकर यांनी आपल्या 'निशाणी डावा अंगठा' या कादंबरीतून केले आहे. साक्षरता अभियानाचा आलेख त्यांनी या कादंबरीतून मांडला आहे. विरूप, विनोदी शैलीत या कादंबरीची मांडणी लेखकाने केली आहे. रा. रं. बोराडे यांच्या महानगर, राहट पाळणा, इथं एक गाव होतं, मरणकळा, नामदार श्रीमती इ. कादंबऱ्याही या काळात प्रकाशित झाल्या दुष्काळामुळे मेटाकुटीला आलेल्या दामाच्या कुटुंबाची होणारी वाताहात 'रानसाखळी' या कादंबरीतून भीमराव वाघचौरेंनी मांडली आहे.

## ग्रामीण कादंबरीचे स्वरूप व स्थान

प्रारंभापासूनच मराठी साहित्यात ग्रामीण जीवनाला हवे ते स्थान मिळालेले नाही. पांढरपेशांनी शहरी मध्यमवर्गाचे केलेले चित्रण म्हणजे मराठी साहित्य नव्हे, तेव्हा आमचे खरे जीवन साहित्यात आले पाहिजे, असा विचार १९७५ नंतरची तरुण पिढी एकत्र येऊन करू लागली. १९७५ पासून खेड्यातील सुशिक्षित तरुणांनी ग्रामीण साहित्यविषयक चळवळ सुरु केली. या चळवळीने ग्रामीण लेखकांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला.



199

आपल्या कादंबऱ्यांतून हा लेखक वास्तव परिस्थिती मांडू लागला. परंपरागत ग्रामीणजीवनापेक्षा बदलते ग्रामजीवन या कालखंडात कादंबऱ्यांतून चित्रित झालेले दिसते. बा. ग. केसकर यांनी ऊसतोडणी कामगारांच्या जीवनावर 'कुणाच्यां खांद्यावर' ही कादंबरी लिहिली. या कामगारांना किती कष्टाचे जीवन जगावे लागते व त्यांचे कौटुंबिक जीवन किती व कसे उद्ध्वस्त होते, याचे वर्णन या कादंबरीत आहे. 'विषवृक्षाच्या मुळ्या' ही वासुदेव मुलाटे यांनी लिहिलेली कादंबरी सहकारी चळवळीने आजच्या घडीचे खरे पण विकृत रूप चित्रित करते. सर्वसामान्यांचा आर्थिक विकास साधण्यासाठी सहकारी चळवळीचा जन्म झाला. पण या चळवळीने सर्वसामान्यांऐवजी आर्थिकदृष्ट्या सबलांचेच हित पाहिले. १९८० नंतरची कादंबरी आशयदृष्ट्या संपन्न झाल्याचे निदर्शनास येते.
ग्रामीण साहित्याने मराठी साहित्याच्या कक्षा विस्तृत केल्या आहेत. लौकिक जीवनाला शब्दरूप देणारे हे साहित्य ग्रामीण माणसांच्या भावभावना, वृत्तीप्रवृत्ती, गाव, कुटुंब यांच्याशी असणारी त्यांची बांधिलकी, माणसामाणसांतले परस्पर संबंध, ग्रामजीवनातले अनेक प्रश्न, संकटे, अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था, सण, उत्सव ग्रामीण समाजातील सत्तास्थाने आदींसह कृषिसंस्कृतीला शब्दरूप देते. मध्यमवर्गीय शहरी लेखकापेक्षा ग्रामीण लेखकाचे अनुभवविश्वाच्या पार्श्वभूमीवर ग्रामजीवनाचा वैविध्यपूर्ण वेध घेणारे हे साहित्य त्यांच्यातल्या जिवंतपणाने उमटून दिसते. डॉ. गुदेकर लिहितात, "शेतीवर अवलंबून असणाऱ्या, मातीशी अतूट नाळ असणाऱ्या, कष्टकरी स्त्री–पुरुषांच्या जीवनवास्तवाचे कलात्मक दर्शन घडविणे, शोषणमुक्त,भयमुक्त, समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी झटणाऱ्या किंवा अशा प्रकारच्या समाजनिर्मितीची स्वप्ने पाहणाऱ्या नायक–नायिकांचे चित्रण करणे, हे ग्रामीण साहित्याचे प्रयोजन आहे. ग्रामीण साहित्य अंधश्रद्धा निर्मूलन, विज्ञान, तंत्रज्ञान यांचे स्वागत करते. ग्रामीण माणसांचे सर्वांगीण जीवन सुखी व्हावे, हा ग्रामीण साहित्याचा ध्यास आहे. ग्रामीण साहित्याची निष्ठा माणसांवर आणि त्यांच्यातील माणुसकीवर आहे. कृषिनिष्ठ, कृषिअधिष्ठित ग्रामीण समाज हा ग्रामीण साहित्याचा केंद्रबिंदू आहे. शोषणमुक्तीच्या चळवळी, वर्ण–वर्ग–जाती, स्त्री–दास्यांताच्या चळवळी ग्रामीण साहित्य चळवळीला समविचारी वाटतात. ग्रामीण जीवनातील या नव्या जाणिवांचे चित्रण करणे, हेही ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रयोजन आहे."[६]

मराठी ग्रामीण कादंबरी ही वास्तववादी, समस्याप्रधान कादंबरी आहे. ग्रामीण जीवनानुभव समर्थपणे मांडण्याचे काम मराठी ग्रामीण कादंबरीने केले आहे. विश्वास पाटलांची 'झाडाझडती' (१९९२) ही एक लक्षवेधी कादंबरी आहे. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा महत्त्वाचा प्रश्न तिने मांडला आहे. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ही कादंबरी जांभळी गावाच्या धरणग्रस्तांची कहाणी सांगते. धरणग्रस्तांना करावा लागणारा संघर्ष व त्यांचे होणारे शोषण त्याचे वास्तवदर्शी चित्र तेवढ्याच ताकदीने लेखकाने जिवंत केले आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांबरोबरच दलित, देवदासी वर्गाच्या समस्या, त्यांच्या जीवनाचे चित्रण १९८० नंतरची कादंबरी करते. राजन गवस यांची भंडारभोग (१९८४), चौडक (१९८५) या कादंबऱ्या देवदासी, जोगतिणी, जोगते यांच्या जीवनातील दुःखभोग मांडतात. १९८० मध्ये प्रकाशित झालेली 'नटरंग' ही आनंद यादव यांची कादंबरी तमाशातील नाच्याच्या वाट्याला आलेल्या दुःखाचे चित्रण करते. राजन गवस यांचीच 'तणकट' (२००२) ही साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी समकालीन दलित चळवळीचा दिशाहीन प्रवास मांडते. सवर्ण–दलित राजकारणाचे अनेक पैलू तिने समर्थपणे साकारले आहेत. महारवाड्यात राहणाऱ्या कबीरचा संघर्ष तिने मांडला आहे. परंपरागत व्यवस्थेमध्ये शिकणारा कबीर अवतीभोवतीचे राजकारण, समाजव्यवस्था, मूल्यऱ्हास व राजकारणातील दिशाहीनता अशा परिस्थितीमध्ये जगताना कसा हतबल होतो, त्याचे चित्रण 'तणकट' ही कादंबरी करते.

'रागवेळ' ही १९९३ मध्ये प्रकाशित झालेली नामदेव कांबळे यांची साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी. कांबळे यांनी विदर्भातील ग्रामीण भागातील मातंग समाजाचे चित्रण या कादंबरीतून केले आहे. कळणू जाधवाची विधवा पत्नी वालंबी व तिच्या मुलांची ही कथा आहे. धर्म, रूढीपरंपरा, जात, आर्थिक विषमता यांद्वारे मातंग समाजाची व्यथा सशक्तपणे ही कादंबरी मांडते. 'रागवेळ'नंतरची 'ऊनसावली' व 'सांजरंग' अशा पुढच्या दोन कादंबऱ्या लिहून लेखकाने या कादंबरीतील रघूचा विकसनशील प्रवास मांडला आहे. बाबाराव मुसळे यांच्या 'पाखळ' (२००४) या कादंबरीमध्ये मातंग समाजाच्या तीन पिढ्यांचे चित्रण येते. मतांचे राजकारण, समाजपरिवर्तनाची चळवळ या अंगाने मातंग समाजाच्या जीवनाचा वेध ही कादंबरी घेते. उत्तम बंडू तुपे यांनी 'झुलवा' (१९९२) या कादंबरीतून जोगतिणी, देवदासींच्या जीवनातील दाहक दुःख मांडले आहे.

ग्रामीण साहित्याची वास्तवदर्शी निर्मिती १९६० च्या आसपास झाली, असे साधारणतः म्हणता येईल. १९६० नंतरच्या चार–पाच दशकात ग्रामीण साहित्यामध्ये, कादंबरीचा विचार करता–ग्रामीण कादंबरीमध्ये समर्थपणे निर्मिती झाली आहे. मध्यवर्ती साहित्यामध्ये न येणारे चित्रण मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये आले आहे. वास्तवाशी संबंध ठेवणारी साहित्यनिर्मिती १९८० नंतरच्या काळामध्ये झालेली आहे. भारतीय समाजव्यवस्था





Scanned with CamScanner

कृषिप्रधान आहे. ग्रामीण कादंबरीतून प्रकट होणारी सुखदु:खे प्रामुख्याने शेतकऱ्यांची आहेत. त्याचबरोबर इतरही समाजघटकांचा, त्यांच्या जीवनाचा, सुखदु:खाचा विचार तिने केला आहे. १९८० नंतरच्या काळात ग्रामीण साहित्याचे मोठ्या प्रवाहात रूपांतर झालेले दिसते. डॉ. आनंद यादव, वासुदेव मुलाटे, बाबाराव मुसळे, नामदेव कांबळे, रवींद्र शोभणे, सदानंद देशमुख यांनी ग्रामीण कादंबरीला एका उंचीवर नेऊन ठेवले आहे. अलीकडच्या काळामध्ये अनेक गोष्टी ग्रामीण संस्कृतीवर आक्रमण करीत आहेत. अलीकडच्या लेखकांनी या वस्तुस्थितीचे चित्रण आपल्या साहित्यातून करायला हवे. डॉ. आनंद यादव म्हणतात, "लेखकांना जबाबदारी पेलण्यासाठी आपल्या वाचनाचा आवाका मोठ्या प्रमाणात वाढविणे आवश्यक आहे. नव्या पिढीतील साहित्यिकांचे, इतर साहित्याचे वाचन फारच कमी दिसते.त्यांचे इंग्रजीचे वाचन तर नाहीच नाही, पण मराठीचेही नाही, हा अनुभव मला येतो. एवढेच नाही, तर त्यांच्या कानावर मराठीतील काही प्रयोगशील नियतकालिकांची नावेही अजून गेलेली नाहीत. तरी त्यांची चार-चार, पाच-पाच पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. अधूनमधून त्यांच्या वाचनात बाजारी नियतकालिकांतील जे अतिसामान्य ग्रामीण साहित्य येईल, तेवढेच ते वाचत असतात."[२] जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे नवनवीन प्रकल्प उभारल्या जात आहेत. त्यामुळे अनेक शेतकरी आज भूमिहीन होत आहेत. ग्रामीण कादंबरीतून शेतकऱ्यांच्या या परिस्थितीचे चित्रण होणे आवश्यक आहे. जागतिकीकरणामुळे ग्रामीण संस्कृतीवर होणारे परिणाम, बदलणारी खेडी, परिस्थिती याचे बारकावे, संदर्भ ग्रामीण कादंबरीने टिपायला हवेत.

## समारोप

एकंदरीत १९८० नंतरची ग्रामीण कादंबरी ही वास्तववादी आणि समस्याप्रधान कादंबरी आहे. ग्रामीण जीवनाशी जवळीक असणाऱ्या लेखकाने आपले ग्रामीण परिसरातील प्रत्यक्ष अनुभव कादंबरीबद्ध केल्याने या अनुभवात अधिक जिवंतपणा आला आहे. या कादंबऱ्यांतून प्रामुख्याने खेड्यातील कष्टकरी, भटके, दलित आणि शेतकरी वर्गाच्या दु:स्थितीच्या वास्तव चित्रणावर भर दिलेला असल्याने ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविण्यात १९८० नंतरची कादंबरी यशस्वी झालेली दिसते. यापुढे जागतिकीकरणाने निर्माण होणाऱ्या परिस्थितीचे चित्रण, ग्रामीण संवेदन मराठी ग्रामीण कादंबरीने मांडायला हवे.

## संदर्भ


१. डॉ. श्रीराम गुंदेकर, मूल्यसंकल्पना व साहित्यविचार, संपादक– प्रकाश मेदककर, औरंगाबाद, आवृत्ती २००४, पृ. क्र.२४६ वरून उद्धृत.

२. डॉ. आनंद यादव, ग्रामीण–दलित साहित्याचा अनुबंध, संपादक– डॉ. म. सु. पगारे, पुणे, आवृत्ती पहिली २०१०, पृ. क्र. ९७ वरून उद्धृत.


❖❖❖

330

Co - Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana





Scanned with CamScanner